MHYA0010014952021

दाखल तारीख : २६/०८/२०२१
नोंदणी तारीख : २६/०८/२०२१
निकाल तारीख : ३०/०३/२०२६
कालावधी : वर्ष महीने दिवस
०४ ०७ ०४

# भाग - अ

**[ परिच्छेद क्र.४४(१), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ यांचे न्यायालयात.**
(पिठासीन अधिकारी : पी.एस.इंगळे )

**सत्र खटला क्रमांक :- ७०/२०२१** **निशाणी क्रमांक :- ८७**

| न्यायनिर्णय दिनांक :- ३०/०३/२०२६ | |
|---|---|
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र सरकार तर्फे,**<br>पोलीस स्टेशन यवतमाळ शहर,<br>जि. यवतमाळ. |
| **फिर्यादीतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता** | **श्री.** व्ही. एस.तेलंग |
| **- विरूद्ध -** | |
| **आरोपी** | १. राकेश मोहन गाडेकर,<br>वय – ३२ वर्षे, धंदा – ठेकेदारी,<br>रा. वारेगाव पो. बिना, पो.स्टे. खापरखेडा,<br>ता. कामठी, जि. नागपुर.<br><br>२. राकेश बाबू बैरीसाल,<br>वय – ३६ वर्षे, धंदा – दलाली (प्रॉपर्टी)<br>रा. लष्करी बाग, भोसले वाडी, प्रसाद चक्की समोर,<br>पो. स्टे. पाचपावली, जि. नागपुर.<br><br>३. हरदीप प्रताप टाक,<br>वय – ३५ वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा. नविन नकाशा, लष्करी बाग,<br>जैस्वाल रेस्टॉरन्ट जवळ, नागपुर, जि. नागपुर.<br><br>४. विनय सुनिल नारनवरे,<br>वय – ३४ वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा. लुम्बीनी नगर, मेकोल्प बाग, नागपुर,<br>जि. नागपुर, पो. स्टे. जरीपटका, जि. नागपुर. |

| | |
|---|---|
| | ५**.** संतोष अशोक मडावी**,**<br>वय – ३९ वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा. नविन फुटारा गल्ली नं.७,अमरावती रोड,<br>नागपुर, पो.स्टे, अंबाझरी, जि. नागपुर. |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | ॲड. श्री. इमरान देशमुख |

**<u>भाग -ब</u>**
**[ परिच्छेद क्र.४४(२), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | २८/११/२०१४ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २९/११/२०१४ |
| फिर्याद/दोषारोपपत्र दिनांक | १३/०३/२०१५ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | २१/०३/२०२४ |
| दोषारोप पुर्वीच्या पुरावा दिनांक | निरंक |
| न्यायानिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | ३०/०३/२०२६ |
| शिक्षा पारित केल्याचा दिनांक, जर असेल तर | ..... |

**<u>आरोपींचा तपशील</u>**

| अ.क्र | आरोपींचे नांव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा / आरोप | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी फौ.प्र.सं.क. ४२८नुसार सुट देणेकरीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राकेश मोहन गाडेकर | २९/११/१४ | १२/७/२३ | भारतीय दंड संहितेचे कलम ३९९ व शस्त्र कायदा, चे कलम ४/२५ प्रमाणे | आरोपींना दोषमुक्त करण्यात आले. | निरंक | निरंक |
| २. | राकेश बाबू बैरीसाल | -’’- | -’’- | -’’- | -’’- | -’’- | -’’- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | हरदिप प्रताप टाक | -''- | ०३/८/२३ | -''- | -''- | -''- | -''- |
| ४. | विनय सुनिल नारनवरे | -''- | १२/७/२३ | -''- | -''- | -''- | -''- |
| ५. | संतोष अशोक मडावी | -''- | -''- | -''- | -''- | -''- | -''- |

## न्यायनिर्णय

**(दिनांक ३०/०३/२०२६ रोजी पारीत)**

या प्रकरणामध्ये आरोपींच्या विरोधात भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम ३९९ व शस्त्र कायदा, १९५९ चे कलम ४ सह वाचित कलम २५ (1-B) (b) प्रमाणे होणा-या अपराधांबाबतचा खटला चालविण्यात आला.

२. फिर्यादीचे प्रकरण थोडक्यात असे की घटना दिनांक २८/११/२०१४ रोजी रात्री १०.०० ते १०.३० वाजताच्या दरम्यान चिचबर्डी, ता. नेर जि. यवतमाळ येथील वाघाई मंदिराजवळ घडली. त्यावेळी तक्रारकर्ते वसंत सदाशिव मडावी हे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय येथे वाचक फौजदार म्हणून नेमणूकीस होते. त्यावेळी, तक्रारकर्ते वसंत मडावी हे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राहुल मदने, पोलीस हेड कॉन्सटेबल ७८१ राहुल मनवर, पोलीस कॉन्सटेबल २२५८, २२१५, ७९२, १९९२ व चालक पोलीस हेड कॉन्सटेबल ७९१ संजय कांबळे यांच्यासोबत जिपने यवतमाळ शहरात नेर रस्त्याने पेट्रोलींग करीत असतांना, लोहारा चौफुलीवर गेले. त्यावेळी गोपनिय बातमीदारांकडून माहिती प्राप्त झाली की काही लोक पांढऱ्या रंगाचे स्कॉरपिओ चारचाकी वाहन घेवून नेर रस्त्यावरील दुमनापूर देवस्थानाचे समोर चिचबर्डी शिवारातील वाघाई मंदीराजवळ दरोडा टाकण्याच्या तयारीने लपून बसलेले आहे. अशा माहिती वरून पंच व पोलीस कर्मचा-यांसह, तक्रारकर्ते वसंत मडावी हे चिचबर्डी शिवारातील वाघाई मंदीराजवळ २२.३० वाजता दरम्यान गेले असता, मंदीराचे बाजूला पांढऱ्या रंगाची स्कॉरपिओ गाडी उभी करून काही लोक आपले तोंडाला मोठे रूमाल बांधून दरोडा टाकण्याची तयारी करीत असतांना लपून बसलेले दिसले. लपत-छपत जावून त्यांना

पोलीस स्टाफसह घेराव टाकूण जिपचे लाईट चे उजेडात पकडण्यास ते गेले असता, त्यांना १ ते ५ इसम मिळून आले. त्यांच्या अंगझडती मध्ये जप्ती पंचनाम्याप्रमाणे मुद्देमाल जप्त केला. राकेश मोहन गाडेकर याच्या जवळून एक धारदार लोखंडी तलवार, हरदिप प्रताप टांक याच्या जवळून एक लोखंडी पाईप, विनय सुनिल नारनवरे याच्या जवळून एक लोखंडी धारदार चाकू, संतोष अशोक मडावी याच्या जवळून एक माचीस व गुन्हा करण्याकरीता वापरण्यात आलेली पांढ-या रंगाची स्कॉरपिओ गाडी क्रमांक एम.एच-४०-ए.सी.९१९१ आणि राकेश बाबू बैरीसाल यांच्या जवळून एक मिरची पावडर पॉकीट, असा सर्व मुद्देमाल जप्ती पंचनाम्याप्रमाणे पंचा समक्ष जप्त करून ताब्यात घेतला. सबब, तक्रारकर्ते वसंत मडावी यांनी आरोपींच्या विरोधात संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये कैफियत दिली. कैफियत प्राप्त झाल्यानंतर, पोलीसांनी आरोपींच्या विरोधात गून्हा नोंदविला. पोलीसांनी घटनेचा तपास केला तसेच साक्षीदारांची बयाने नोंदविली. तपासादरम्यान, पोलीसांनी घटनेचा तपास केला तसेच आरोपींना अटक करून सर्व आरोपींचा "अटकेचा नमुना" (arrest form) तयार केला. तपासाअंती, पोलीसांनी आरोपींच्या विरोधात दोषारोपपपत्र न्यायालयात दाखल केले.

३. माझ्या विद्वान पूर्वाधिका-यांनी आरोपींच्या विरोधात भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९९ व शस्त्र कायदा, १९५९ चे कलम ४ सह वाचित कलम २५ (1-B) (b) प्रमाणे होणा-या अपराधांबाबतचे आरोप निश्चित केले व ते आरोपींना वाचुन व समजावून सांगण्यात आले. मात्र, आरोपींनी ते कबुल नसल्याचे सांगून खटला चालविण्याची तयारी दर्शवली.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे नोंदविण्यात आलेल्या आरोपींच्या बयाणावरून, आरोपींचा बचाव संपूर्ण नकाराचा असल्याचे स्पष्ट होते.

५. फिर्यादीतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.व्ही.एस.तेलंग व आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. इमरान देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला तसेच प्रकरणाचे अवलोकन केले. फिर्यादीतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.व्ही.एस.तेलंग यांनी फिर्यादीच्या

प्रकरणाप्रमाणे युक्तीवाद केला. उलटपक्षी, आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. इमरान देशमुख यांनी असा युक्तीवाद केला की फिर्यादीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचा पुरावा शंका निर्माण करणारा असून विश्वासार्ह नाही व त्यामुळे आरोपींना दोषमुक्त करण्यात यावे.

६. प्रकरणाचे अवलोकन केल्यावर आणि दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह येणेप्रमाणे आहेत :-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | फिर्यादीने असे सिध्द केले काय की दिनांक २८/११/२०१४ रोजी रात्री १०.०० ते १०.३० वाजताच्या दरम्यान चिचबर्डी, ता. नेर जि. यवतमाळ येथील वाघाई मंदिराजवळ, आरोपींनी त्यांचा समान उद्देश साध्य करण्याच्या दृष्टीने एक लोखंडी तलवार, एक लोखंडी पाईप, एक लोखंडी चाकू, एक माचीस, मिरची पावडर व स्कॉरपिओ वाहन क्रमांक एम.एच-४०-ए.सी.९१९१ स्वतःजवळ बाळगून दरोडा टाकण्याची पूर्व तयारी केली व त्याव्दारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३९९ प्रमाणे होणारा अपराध केला ? | ...नाही. |
| २. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी, आरोपींनी, त्यांचा समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी, सार्वजनिक रस्त्यावर शस्त्र कायद्याचे कलम ४ अन्वये शस्त्र न बाळगण्याची केंद्र सरकारची अधिसुचना अस्तित्वात असतांना सुध्दा आरोपींनी स्वतः जवळ विनापरवाना वर उल्लेखीत शस्त्र बाळगुन शस्त्र कायद्याचे कलम २५ (1–B) (b) अन्वये होणारा अपराध केला ? | ...नाही. |
| ३. | काय आदेश ? | आरोपींना दोषमुक्त करण्यात आले |

## -: <u>निष्कर्षांची कारणे</u> :-

**<u>मुद्दा क्रमांक १ च्या बाबत</u>** :–

७. भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३९९ प्रमाणे होणा-या अपराधाचा आरोप सिद्ध करण्याकरिता फिर्यादीस असे, माफक संशयापलीकडे, सिद्ध करावे लागते की आरोपींनी दरोडा टाकण्याची पूर्व तयारी करण्याकरीता एक लोखंडी तलवार, एक लोखंडी पाईप, एक लोखंडी चाकू, एक माचीस, मिरची पावडर व स्कॉरपिओ वाहन क्रमांक एम.एच-४०-ए.सी.९१९१ स्वतःजवळ बाळगले.

८. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. तेलंग यांनी असा युक्तीवाद केला की या प्रकरणामध्ये दोन्ही साक्षीदारांनी फिर्यादीच्या प्रकरणाप्रमाणे पुरावा दिलेला आहे. सबब, फिर्यादीने आरोपींच्या विरोधात असलेले आरोप, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले आहेत. सबब, त्यांनी आरोपींना शिक्षा देण्याबाबत युक्तिवाद केला.

९. उलटपक्षी आरोपींचे विद्वान वकील श्री.इमरान देशमुख यांनी असा युक्तिवाद केला की या प्रकरणामध्ये फिर्यादीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांनी दिलेला पुरावा विश्वासार्ह नाही. त्यामुळे त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येणार नाही सबब, त्यांनी आरोपींना दोषमुक्त करण्याचा युक्तिवाद केला.

१०. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यावर, मी या प्रकरणामध्ये साक्षीदारांनी दिलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करीत आहे. वसंत सदाशिव मडावी (फि.सा.क्र.१) हे प्रकरणातील महत्वाचे साक्षीदार आहे, कारण वसंत (फि.सा.क्र.१) हे तक्रारकर्ते, पोलीस उपनिरीक्षक तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. वसंत (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगितले की दिनांक २८/११/२०१४ रोजी ते, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे वाचक फौजदार म्हणून कार्यरत होते व त्यावेळी त्यांच्यासोबत **<u>जमादार राहुल मनवर</u>**, पोलीस कॉन्सटेबल संतोष मडावी, पोलीस कॉन्सटेबल मोहम्मद इकबाल आणि इतर पोलीस कर्मचारी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यरत

होते. तसेच त्यांनी पुराव्या दरम्यान असे सुध्दा सांगीतले की ते नाईट पेट्रोलींग करीत असतांना लोहारा चौफुली येथे यवतमाळ ते नेर रस्त्यावर हजर असतांना गोपनिय माहिती मिळाली की काही लोक यवतमाळ ते नेर रस्त्यावर ढुमणापुर मंदिर परिसरात, वाघाई मंदिर परिसरात दरोडा टाकण्याच्या तयारीत बसलेले आहे. अशा माहितीवरुन त्यांनी तेथे दोन पंचांना बोलवले व त्यानंतर पोलीसांच्या चारचाकी वाहनाने ते वाघाई मंदिराजवळ गेले व तेथे त्यांना एक पांढ–या रंगाची स्कॉरपिओ चारचाकी गाडी उभी दिसली. वसंत (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सुध्दा सांगीतले की त्या व्यक्तींभोवती घेराव टाकून त्यांनी त्या व्यक्तींना पकडले व त्या व्यक्तींना त्यांचे नाव–गाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे राकेश मोहन गाडेकर, विनय सुनिल नारनवरे, संतोष अशोक मडावी, राकेश बाबू बैरीसाल व हरदिप प्रताप टाक, असे सांगीतले. त्यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान पुढे असे सांगीतले की त्या सर्वांची झडती घेतली असता, त्या झडतीमध्ये राकेश मोहन गाडेकर याच्याजवळ एक लोखंडी तलवार, विनय सुनिल नारनवरे याच्याजवळ एक लोखंडी चाकू, हरदिप टाक याच्याजवळ एक लोखंडी पाईप, संतोष मडावी याच्याकडून एक माचीस व चारचाकी स्कॉरपीओ वाहन व राकेश बैरीसाल याच्याकडून मिरची पावडरचे पॅकेट, असा मुददेमाल मिळून आला. हा सर्व मुददेमाल पंचांसमक्ष जप्ती पंचीनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आल्याचे सुध्दा त्यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान सांगीतले. तसेच वसंत (फि.सा.क्र.१) यांनी असे सुध्दा पुराव्या दरम्यान सांगीतले की त्यांनी सर्व आरोपींच्या विरोधात पोलीस स्टेशनला कैफियत दिली. घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावर त्यांच्या व पंचांच्या सह्या असल्याचे व त्यातील मजकूर बरोबर असल्याचे त्यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान सांगीतले.

११. मात्र, वसंत (फि.सा.क्र.१) यांनी दिलेल्या उपरोक्त पुराव्यास त्यांचेच सहकारी व सहाय्यक पोलीस फौजदार असलेले राहूल मनवर (फि.सा.क्र.२) यांनी पुष्टी दिलेली नाही. वसंत (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगीतले की कथित घटनेच्या वेळी त्यांच्यासोबत जमादार राहूल मनवर (फि.सा.क्र.२) हे होते. म्हणजे

राहूल (फि.सा.क्र.२) हे कथित घटनेच्या वेळी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून हजर असल्याचे वसंत (फि.सा.क्र.१) यांच्या पुराव्याव्दारे स्पष्ट होते. मात्र, राहूल (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगीतले नाही की कथित घटनेच्यावेळी ते वसंत (फि.सा.क्र.१) यांच्यासोबत घटनास्थळावर हजर होते. उलटपक्षी, राहूल (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगीतले की घटनेची कैफियत वसंत (फि.सा.क्र.१) यांनी दिली. सबब, कथित घटनेच्यावेळी वसंत (फि.सा.क्र.१) यांच्यासोबत राहूल (फि.सा.क्र.२) हजर असल्याबाबत वसंत (फि.सा.क्र.१) यांनी दिलेला पुरावा पुष्टीविरहीत आहे, कारण राहूल (फि.सा.क्र.२) यांनी तसा कोणताही पुरावा दिलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये वसंत (फि.सा.क्र.१) यांचा पुष्टीविरहीत पुरावा, फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण करणारा असून तो फिर्यादीस कोणत्याही उपयोगाचा ठरणार नाही. याशिवाय, उपरोक्त दोन्ही साक्षीदारांनी दिलेल्या वर उल्लेखीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की त्यांनी दिलेला पुरावा एकमेकांच्या पुराव्याशी विसंगत आहे. सबब, परस्पर विसंगती असणारा त्यांचा पुरावा फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण करतो.

१२. याशिवाय, प्रथम खबर अहवाल (F.I.R.) (निशाणी क्रमांक ५१) मध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की राकेश मोहन गाडेकर याच्या जवळून एक लोखंडी तलवार, हरदिप प्रताप टांक याच्या जवळून एक लोखंडी पाईप, विनय सुनिल नारनवरे याच्या जवळून एक लोखंडी चाकू, संतोष अशोक मडावी याच्या जवळून एक माचीस व गुन्हा करण्याकरीता वापरण्यात आलेली पांढ-या रंगाची स्कॉरपिओ गाडी क्रमांक एम.एच-४०-ए.सी.९१९१ आणि राकेश बाबू बैरीसाल याच्या जवळून एक मिरची पावडर पॉकीट, असा सर्व मुद्देमाल जप्ती पंचनाम्याप्रमाणे वसंत (फि.सा.क्र.१) यांनी पंचा समक्ष जप्त करून ताब्यात घेतला. या स्वरुपाचाच पुरावा वसंत (फि.सा.क्र.१) यांनी दिला.थोडक्यात, वसंत (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगीतले की आरोपींकडून उपरोक्त मुद्देमाल जप्त करण्यात आला. मात्र, राहूल (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगीतले की स्कॉरपिओ वाहनामध्ये एक तलवार, मिरची पावडरची पूडी, माचीस,

दोन-तिन लाठया मिळून आल्या. सबब, राहूल (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगीतले <u>नाही</u> की आरोपींकडून वर उल्लेखीत मुददेमाल जप्त करण्यात आला होता. उलटपक्षी, राहूल (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगीतले की उपरोक्त मुद्देमाल स्कॉरपिओ वाहनामध्ये होता. सबब, दरोडा टाकण्याची पूर्व तयारी करण्यासाठी आरोपींकडून उपरोक्त मुद्देमाल जप्त केल्याबाबत वसंत (फि.सा.क्र.१) यांनी दिलेल्या पुराव्यास राहूल (फि.सा.क्र.२) यांनी पुष्टी न दिल्यामुळे, वसंत (फि.सा.क्र.१) यांचा पुष्टीविरहीत पुरावा आरोपींकडून कथित मुद्देमाल जप्त झाल्याबाबत शंका निर्माण करतो व त्यामुळे त्यांचा पुरावा फिर्यादीस कोणत्याही उपयोगाचा ठरणार नाही.

१३. तसेच, राहूल (फि.सा.क्र.२) यांनी दिलेला पुरावा हा प्रथम खबर अहवाल तसेच फिर्यादीच्या प्रकरणाच्या विरोधात आहे. प्रथम खबर अहवालाचे अवलोकन केल्यावर असे स्पष्ट होते की त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की आरोपीकडून वर उल्लेखीत मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे. मात्र, राहूल (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगीतलेले <u>नाही</u> की आरोपींकडून वर उल्लेखीत मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे. उलटपक्षी, त्यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगीतले की वर उल्लेखीत मुद्देमाल स्कॉरपिओ वाहनामध्ये मिळून आला. सबब, पोलीस सहाय्यक फौजदार व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेले राहूल (फि.सा.क्र.२) यांनी दिलेला पुरावा प्रथम खबर अहवालाशी तसेच फिर्यादीच्या प्रकरणाशी सुसंगत नसल्यामुळे त्यांचा पुरावा शंका निर्माण करणारा आहे. त्यामुळे राहूल (फि.सा.क्र.२) यांच्या पुराव्यावर न्यायालयास विश्वास ठेवता येणार नाही.

१४. वसंत (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगीतले की सर्व मुद्देमाल पंचांसमक्ष जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आला होता व त्याबाबतच्या घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावर त्यांची व पंचांची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. मात्र, घटनास्थळ जप्ती पंचनामा (निशाणी क्रमांक ५२) कथितपणे पंचासमक्ष तयार करण्यात आल्याची बाब सिध्द करण्यासाठी, या प्रकरणात शंका निर्माण करणा-या

पुराव्याचा विचार करता, फिर्यादीतर्फे त्या पंचनाम्यावरील पंचांना तपासणे आवश्यक होते. मात्र, फिर्यादीतर्फे पंचांना तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे, कथित जप्तीबाबत शंका निर्माण होते. सबब, आरोपींकडून वर उल्लेखीत मुद्देमाल जसे शस्त्र इत्यादी जप्त झाल्याचे फिर्यादीतर्फे, माफक संशयापलीकडे, सिध्द करण्यात आलेले नाही. परिणामतः, आरोपींनी उपरोक्त मुद्देमाल स्वतः जवळ बाळगून दरोडा टाकण्याची पूर्व तयारी केली, हे फिर्यादीतर्फे, माफक संशयापलीकडे, सिध्द करण्यात आलेले नाही.

१५. याशिवाय, फिर्यादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या दस्तऐवजांव्दारे सुध्दा आरोपींकडून कथितपणे वर उल्लेखीत मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे सिध्द होत नाही. याबाबत, मी अटकेचा नमुणा (Arrest Form)(निशाणी क्रमांक ५३ते ५७) चे अवलोकन करीत आहे. उपरोक्त अटकेच्या नमूण्यांचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की त्यामधील परिच्छेद क्रमांक ८ हा आरोपींच्या अंगझडतीमध्ये आढळून आलेल्या वस्तूंबाबतचा आहे. मात्र, त्या परिच्छेद क्रमांक ८ मध्ये आरोपींच्या अंगझडतीमध्ये कोणतीही वस्तू मिळून आल्याचे नमूद नाही. अशा परिस्थितीमध्ये, फिर्यादीतर्फे विश्वास ठेवण्यात आलेल्या दस्तऐवजांमध्येच म्हणजे अटकेच्या नमूण्यांमध्येच आरोपींच्या अंग झडतीमध्ये कोणताही मुद्देमाल म्हणजे शस्त्र, साहित्य इत्यादी जप्त झाल्याचे नमूद करण्यात आलेले नाही. या सर्व बाबींचा विचार करता, आरोपींच्या ताब्यामधून कथितपणे वर उल्लेखीत मुद्देमाल जप्त केल्याची बाब फिर्यादीतर्फे, माफक संशयापलीकडे, सिध्द करण्यात आलेली नाही. परिणामतः, फिर्यादीतर्फे हे, माफक संशयापलीकडे, सिध्द करण्यात आलेले नाही की आरोपींनी वर उल्लेखीत मुद्देमाल स्वतःजवळ बाळगून दरोडा टाकण्याच्या उद्देशाने पूर्व तयारी केली होती.

१६. याशिवाय, वसंत (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या उलटतपासणी दरम्यान असे कबुल केलेले आहे की लोहारा चौफुली येथे दुकाने असल्यामुळे तेथे लोक रात्री जागी असतात. तसेच तेथे ऑटो वाहनाचा थांबा असून तेथे लोकांची वस्ती देखील आहे. अशा परिस्थितीमध्ये तसेच प्रकरणात उपलब्ध असलेल्या उपरोक्त पुराव्याचा विचार करता,

फिर्यादीतर्फे या प्रकरणामध्ये स्वतंत्र साक्षीदारांची बयाने (independent witnesses) घेवून त्यांना तपासणे आवश्यक होते. मात्र, फिर्यादीतर्फे तसे करण्यात आलेले नाही. सबब, फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण होते. सबब, या सर्व बाबींचा एकत्रीत परिणाम असा आहे की फिर्यादीने आरोपींच्या विरोधात असणा-या उपरोक्त अपराधाचे आवश्यक घटक, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

**मुद्दा क्रमांक २ च्या बाबत** :–

१७. शस्त्र कायद्याचे कलम ४ सह वाचित कलम २५ (1-B) (b) प्रमाणे होणा-या अपराधाचे आवश्यक घटक सिध्द करण्याकरिता फिर्यादीस असे, माफक संशयापलीकडे, सिध्द करावे लागते की घटनेच्या वेळी शस्त्र कायद्याचे कलम ४ मधील तरतुदीचा भंग करून आरोपींनी स्वतःच्या ताब्यामध्ये एक लोखंडी तलवार व एक लोखंडी चाकू स्वतःजवळ बाळगले. थोडक्यात, आरोपींच्या ताब्यामध्ये अवैधपणे शस्त्र असल्याची बाब फिर्यादीस सिध्द करावी लागते.

१८. यात शंका नाही की या प्रकरणामध्ये फिर्यादीस असे, माफक संशयापलीकडे, सिध्द करावे लागते की आरोपींच्या ताब्यामध्ये घटनेच्या वेळी तलवार व चाकू हे शस्त्र होते. मात्र, मुद्दा क्रमांक १ वर चर्चा करतांना मी, कारणासह, अगोदरच असे ठरविलेले आहे की फिर्यादीतर्फे असे, माफक संशयापलीकडे, सिध्द करण्यात आलेले नाही की कथित घटनेच्या वेळी आरोपींच्या ताब्यामध्ये उपरोक्त शस्त्र होते.

१९. याशिवाय, वसंत (फि.सा.क्र.१) आणि राहूल (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान कुठेही असे सांगीतले नाही की घटनेच्या वेळी शस्त्र न बाळगण्याबाबत शस्त्र कायद्यांतर्गतचे परिपत्रक किंवा अधिसूचना निर्गमीत करण्यात आलेली होती व तसे परिपत्रक अथवा अधिसूचना घटनेच्या वेळी अस्तित्वात होती. सबब, शस्त्र न बाळगण्याबाबत शस्त्र कायद्यांतर्गतचे परिपत्रक किंवा अधिसूचना, घटनेच्या वेळी अस्तीत्वात असल्याची बाब सुध्दा फिर्यादीतर्फे सिध्द करण्यात आलेली नाही. या सर्व

बाबी, फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण करणा-या आहेत.

२०. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. तेलंग यांनी असा युक्तीवाद केला की या प्रकरणामध्ये एका साक्षीदाराच्या म्हणजे वसंत (फि.सा.क्र.१) यांनी दिलेल्या पुराव्याच्या आधारे आरोपींच्या विरोधात असलेले आरोप सिध्द होतात. सबब, त्यांनी आरोपींना शिक्षा देण्याची विनंती न्यायालयास केली.

२१. उलटपक्षी, आरोपींचे विद्वान वकील श्री. इमरान देशमुख यांनी असा युक्तिवाद केला की या प्रकरणामध्ये फिर्यादीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांनी दिलेला पुरावा परस्पर विसंगत असून त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येणार नाही. सबब, त्यांनी आरोपींना दोषमुक्त करण्याचा युक्तिवाद केला.

२२. या मुद्दयावर उपरोक्त युक्तीवाद ऐकल्यानंतर, मला येथे भारतीय पुरावा कायदा,१८७२ (Indian Evidence Act, 1872) चे कलम १३४ चा संदर्भ घेणे आवश्यक वाटते. यात शंका नाही की *भारतीय पुरावा कायदा,१८७२ (Indian Evidence Act, 1872) चे कलम १३४* मधील तरतुदींच्या आधारे कोणतेही तथ्य (fact) सिध्द करण्यासाठी साक्षीदारांच्या विशिष्ट संख्येची आवश्यकता नसते. थोडक्यात, साक्षीदारांची संख्या नव्हे तर गुणवत्ता महत्वाची आहे. सबब, उपरोक्त तरतुदीच्या आधारे फक्त एका साक्षीदाराच्या पुराव्याव्दारे सुध्दा कोणतेही तथ्य (fact) सिध्द होउ शकते. मात्र, त्या साक्षीदाराचा पुरावा विश्वासार्ह असणे आवश्यक आहे तसेच त्या साक्षीदाराने दिलेला पुरावा शंका निर्माण करणारा नसावा. मात्र, उपरोक्त चर्चेव्दारे, मी, अगोदरच कारणांसह, असे ठरविले आहे की वसंत (फि.सा.क्र.१) यांचा पुरावा विश्वासार्ह नाही तसेच त्यांच्या पुराव्याव्दारे फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका उत्पन्न होते. अशा परिस्थितीमध्ये, फक्त एका साक्षीदाराच्या म्हणजे वसंत (फि.सा.क्र.१) च्या पुराव्याव्दारे फिर्यादीचे प्रकरण सिध्द होत असल्याच्या सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांच्या युक्तिवादाशी मी सहमत नाही. परिणामतः, उपरोक्त चर्चेचा एकत्रीत परिणाम (cumulative effect) आहे की फिर्यादीने

आरोपींच्या विरोधात असलेले उपरोक्त आरोप, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाही.

२३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी पुरसिस (निशाणी क्रमांक ७३) दाखल करुन त्याव्दारे न्यायालयास असे कळविले आहे की फिर्यादीतर्फे महत्वाचे साक्षीदार तपासण्यात आलेले आहे, मात्र तपास अधिकारी पी.एस.आय. अरुण डोईफोडे हे सेवानिवृत्त झालेले असून त्यांचा पत्ता फिर्यादीपक्षास बरेच समन्स पाठवून सुध्दा मिळून आलेला नाही व त्यामुळे सरकार पक्षाने फिर्यादीच्या पुराव्याची बाजू बंद केली. सबब, या सर्व बाबींचा एकत्रीत परिणाम असा आहे की फिर्यादीने आरोपींच्या विरोधात असणा-या आरोपाचे आवश्यक घटक, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक २ चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

**मुद्दा क्रमांक ३ च्या बाबत** :–

२४. प्रकरणात उपलब्ध पुराव्याचा विचार करता तसेच उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने, मी अगोदरच असे ठरविलेले आहे की फिर्यादीने आरोपींच्या विरोधात असलेले आरोप, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाही. सबब, मी आरोपींना संशयाचा फायदा देत आहे. सबब, आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. दोषारोपपत्राचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की पोलीसांनी एक लोखंडी तलवार किंमत रुपये १००/-, एक लोखंडी पाईप किंमत रुपये ५०/-, एक लोखंडी चाकू किंमत रुपये ५०/-, एक माचीस, मिरची पावडर आणि एक स्कॉरपिओ वाहन क्रमांक एम एच/४०–ए.सी–९१९१ जप्त केल्याचे त्यात नमूद केलेले आहे. जप्त मुद्देमाल कोणीही मागीतलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये, जप्त शस्त्र म्हणजे एक लोखंडी तलवार व एक लोखंडी चाकू, अपिल कालावधीनंतर, जिल्हा दंडाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे नियमानूसार विल्हेवाटीसाठी पाठविण्यास पात्र आहे. एक लोखंडी पाईप किंमत रुपये ५०/-, चा जाहीर लिलाव, अपिल कालावधीनंतर करुन त्यातून येणारी रक्कम सरकार जमा करण्यास पात्र आहे. तसेच एक माचीस व मिरची पावडर, अपिल कालावधीनंतर, नष्ट करण्यास पात्र आहे. जप्त स्कॉरपिओ

वाहन क्रमांक एम एच/४०–ए.सी–९१९१ हे सुप्रतनाम्याच्या बंधपत्रावर संबंधीताला दिल्याचे अभिलेखावरुन दिसते. अशा परिस्थितीमधे, सुप्रतनाम्याची बंधपत्रे, अपिल कालावधीनंतर, रद्द करण्यास पात्र असून ते वाहन त्याच्या मालकाकडे ठेवण्यास पात्र आहे. परिणामतः, मुद्दा क्र. ३ चे उत्तरार्थ, मी खालील आदेश पारीत करीत आहे :-

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपींना भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम ३९९ व शस्त्र कायदा, १९५९ चे कलम ४ सह वाचित कलम २५ (1-B) (b) प्रमाणे होणा-या अपराधाच्या आरोपातून, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २३५(१) अन्वये, दोषमुक्त करण्यात आले. |
| २. | जप्त शस्त्र म्हणजे एक लोखंडी तलवार व एक लोखंडी चाकू, अपिल कालावधीनंतर, जिल्हा दंडाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे नियमानूसार विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावा. |
| ३. | जप्त एक लोखंडी पाईप किंमत रुपये ५०/-, चा जाहीर लिलाव, अपिल कालावधीनंतर करुन त्यातून येणारी रक्कम सरकार जमा करण्यात यावी. |
| ४. | जप्त एक माचीस व मिरची पावडरचे पॅकेट, अपिल कालावधीनंतर, नष्ट करण्यात यावेत. |
| ५. | जप्त स्कॉरपिओ वाहन क्रमांक एम एच/४०–ए.सी.९१९१ बाबतची सुप्रतनाम्याची बंधपत्रे, अपिल कालावधीनंतर, रद्द करण्यात यावी व ते स्कॉरपिओ वाहन त्याच्या मालकाकडेच ठेवण्यात यावे. |
| ६. | आरोपींची जामीन बंधपत्रे रद्द करण्यात यावी. |
| ७. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ प्रमाणे पुर्तता करावी. |

PREMTUSHAR SAMADHANRAO INGLE
Digitally signed by PREMTUSHAR SAMADHANRAO INGLE
Date: 2026.03.30 16:30:06 +0530

दिनांक - ३०/०३/२०२६

(पी. एस. इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

## भाग -क

## [ परिच्छेद क्र.४४(३), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]

## अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| फि.सा.क्र.१ | वसंत सदाशिव मडावी (नि.क्र.४०) | तक्रारकर्ते, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच जप्ती पंचनामा तयार करणारे साक्षीदार |
| फि.सा.क्र.२ | राहुल अभिमान मनवर (नि.क्र.५८) | पोलीस सहाय्यक फौजदार व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

**ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष /न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ५० | कैफियत |
| २. | ५१ | प्रथम वर्दी अहवाल |
| ३. | ५२ | घटनास्थळ जप्ती पंचनामा |
| ४. | ५३ ते ५७ | अटकेचे नमूणे |

**ब. बचाव पक्ष :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणी :

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## ड. मुददेमाल :

| अनुक्रमांक | मुददेमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**CERTIFICATE**

"I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Smt. D.S. Kurzadkar/Kolhe<br>Stenographer Grade-I |
| Name of the Court | Ad-hoc District Judge-1,<br>Yavatmal |
| Date of Signature of Presiding Officer | 30/03/2026 |
| Date of Judgment Uploaded | 30/03/2026 |

DIPALI SOMESHWAR KOLHE
Digitally signed by DIPALI SOMESHWAR KOLHE
Date: 2026.03.30 16:35:03 +0530

दिनांक - ३०/०३/२०२६

(दि.सु.कोल्हे)
लघुलेखक श्रेणी-१, यवतमाळ.
तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, यवतमाळ.